महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) या संवर्गातील शिक्षणाधिकारी व तत्सम या पदावरील १४ अधिकाऱ्यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः-विभाप-२३१९/प्र.क्र.२१/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक -०८ मार्च, २०१९

वाचा :- १. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्रमांक, पी-१(२)(१६)/एक,दि.३१.१०.१९९६
२. शा.शि. व क्री.वि., शा.नि. क्र. एसएओ-२५०८/प्र.क्र.१७१/प्रशा-२, दि. ३१.०७.२००८
३. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची अधिसूचना क्रमांक पी-१(२)(१६)/जुलै, २००९/एक, दि. २०.०१.२०११
४. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, अधिसूचना क्र. पी-१(२)(१६)/एक, दि. २६.०३.२०१३
५. शा.शि. व क्री.वि., शा.नि. क्र. ससेप्र ४३०२/प्र.क्र.७०/१३/प्रशा-२, दि. ०८.०८.२०१३
६. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची अधिसूचना क्र. पी-१(२)(१६)/एक, दि.०६.१२.२०१३
७. शा.शि. व क्री.वि., शा.नि. क्र. ससेप्र ४३०२/प्र.क्र.७०/१३/प्रशा-२, दि. ११.०२.२०१५
८. आयुक्त (शिक्षण) पुणे यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. आस्था-अ/टे.क्र. १०६/वि.प.सूट/ गट-अ/२०१९/१०२६, दिनांक ०८.०२.२०१९

प्रस्तावना:-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (तत्कालीन शिक्षण सेवायोजन व युवा सेवा विभाग) शासन अधिसूचना दिनांक २०.०२.१९८० मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील गट-अ व गट-ब तसेच सामान्य राज्य सेवा गट-ब (प्रशासन शाखा) संवर्गातील राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी एकत्रित विभागीय परीक्षा घेण्यात येते. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय दिनांक ३१.०७.२००८ अन्वये, महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षक प्रशिक्षण शाखा) संवर्गातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमधील प्राचार्य, वरिष्ठ अधिव्याख्याता गट-अ आणि अधिव्याख्याता, गट-ब यांच्यासाठी प्रशासन शाखेसाठी विहीत केलेली विभागीय परीक्षा घेण्याचा निर्णय शासनाने घेतला. तथापि, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी मूळ अर्ज क्र. ७७४/२००९ मध्ये दिनांक ०६.०७.२०१० रोजी दिलेल्या आदेशामध्ये शिक्षक प्रशिक्षण शाखेतील अधिकाऱ्यांना प्रशासन शाखेसाठी विहीत केलेली परीक्षा लागू करता येणार नाही, असे नमूद केले आहे.

२. उपरोक्त वाचा येथे नमूद अ.क्र.२ येथील दिनांक ३१.०७.२००८ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी दिनांक २०.०२.१९८० च्या अधिसूचनेन्वये लागू करण्यात आलेली विभागीय परीक्षा यापूर्वी उमेदवाराने शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत असताना उत्तीर्ण केली असल्यास, त्या उमेदवारांना पुन्हा परीक्षा देण्याची आवश्यकता नाही, अशी तरतूद आहे. त्यानुसार वाचा येथे नमूद अ.क्र. ५ व ७ येथील शासन

निर्णयानुसार महाराष्ट्र शिक्षण सेवा, (प्रशासन शाखा) गट-अ मधील शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर सरळसेवेने नियुक्ती दिलेल्या अधिकाऱ्यांमधील जे अधिकारी शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर नियुक्त होण्यापूर्वी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या अधिपत्त्याखालील क्षेत्रिय कार्यालयांमध्ये गट-ब पदावर कार्यरत असतांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत, त्यांना शिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती झाल्यानंतर विभागीय परीक्षेतून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

उपरोक्त वाचा येथे नमूद केलेल्या दिनांक ८.८.२०१३ व दिनांक ११.२.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवेने महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवारांना महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) गट-अ संवर्गात शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर पदस्थापना दिली आहे. त्यापैकी खालील तक्त्यात नमूद १४ उमेदवारांपैकी १२ उमेदवार हे महाराष्ट्र शिक्षण सेवा, शिक्षणाधिकारी व तत्सम गट-अ (प्रशासन शाखा) संवर्गात सरळसेवेने नियुक्त होण्यापूर्वी उपशिक्षणाधिकारी व तत्सम, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (प्रशासन शाखा) या संवर्गात कार्यरत होते तर उर्वरीत श्रीमती संगिता चंद्रकांत भागवत व श्री. मोहन शशिकांत देसले हे २ उमेदवार अधिव्याख्याता, महाराष्ट्र शिक्षण सेवा गट-ब (शिक्षण प्रशिक्षण शाखा) या संवर्गात कार्यरत असतांना खालील तक्त्यात नमूद त्यांच्या नावासमोर स्तंभ क्रमांक ५ येथे नमूद केलेल्या वर्षात विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाले असल्याने त्यांना शिक्षणाधिकारी व तत्सम पदावर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येत आहे.

अ. क्र.	परिविक्षाधिन अधिकाऱ्यांचे नाव (शिक्षणाधिकारी व तत्सम संवर्ग)	शिक्षणाधिकारी व तत्सम पदावरील नियुक्तीचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	रुजू दिनांक	विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा महिना व वर्ष
१	२	३	४	५
१	श्री. औदुंबर संपतराव उकिरडे	शा.नि.क्र. ससेप्र ४३०२/प्र.क्र.७०/१३/ प्रशा-२ दिनांक ०८.०८.२०१३	०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
२	श्री. सुभाष रमेश बोरसे		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
३	श्री. मुस्ताक महंमद शेख		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
४	श्रीमती वैशाली जगन्नाथ जामदार		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
५	श्री. रमाकांत महादेव काठमोरे		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
६	श्री. शिवलिंग नामदेव पटवे		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
७	श्री. महेश जगन्नाथ चोथे		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
८	श्री. भगवान श्रीधरराव सोनवणे		०१.०७.२०१३	जुलै, १९९६
९	श्रीमती सुनंदा भागाजी ठुबे		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
१०	श्रीमती उर्मिला भाऊसाहेब पारधे		०१.०७.२०१३	जानेवारी, २०१२
११	श्रीमती संगिता चंद्रकांत भागवत		०१.०७.२०१३	जुलै, २००९
१२	श्री. मोहन शशिकांत देसले		०१.०७.२०१३	जुलै, २००९
१३	श्री. शेषराव नामदेव बडे	शा.नि.क्र.ससेप्र ४३०२/प्र.क्र.७० /१३/प्रशा-२ दिनांक ११.०२.२०१५	११.०२.२०१५	जानेवारी, २०१२
१४	श्रीमती मिना हरिभाऊ यादव		११.०२.२०१५	जानेवारी, २०१२

२. वरील तक्त्यात नमूद १४ अधिकाऱ्यांच्या सेवाभिलेखात नियमानुसार आवश्यक त्या नोंदी घेण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांना कळविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य पुणे यांनी करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०३१११३१२०८५६२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ravindra Pralhad Ate

Digitally signed by Ravindra Pralhad Ate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sport Departrment, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fd5fc4fce5f6732e6657dca817ae6ee619a55d170d3c93eff53c3ca69d1a772d, serialNumber=eaa37af2edb5809b000f33d26328f6cdac80ee32afdac3f68b5821d14e41dffa, cn=Ravindra Pralhad Ate
Date: 2019.03.11 16:57:44 +05'30'

(र. प्र. आटे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राद्वारे)
३) सर्व शिक्षण संचालक.
४) सर्व विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
६) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
७) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
८) संबंधित अधिकारी (आयुक्त शिक्षण यांचे कार्यालया मार्फत)

प्रत माहितीसाठी

१) मा. मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे विशेष कार्य अधिकारी.
२) अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांचे स्वीय सहायक.
३) निवडनस्ती